# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२१/M/००१३०४

**अपिलार्थी श्री. प्रभुनाथ मोहनलाल गोयल**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
पूर्व द्रुतगती महामार्ग परिक्षेत्र वाहतुक यांचे कार्यालय,
विक्रोळी वाहतुक विभाग चौकी,
घाटकोपर (पू), मुंबई-७५.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (पूर्व उपनगरे)**
वाहतुक यांचे कार्यालय, ८७, सर पोचखानवाला रोड
वाहतुक पोलिस मुख्यालय,
वरळी, मुंबई- ४०० ०३०.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०६.२०२४</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २२.१२.२०२० | ३१.१२.२०२० | २८.०१.२०२१ | २५.०२.२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २६.०४.२०२१ रोजीच्या अर्जान्वये असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ३१.१२.२०२० संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. २१.१२.२०२० रोजीच्या माहिती अर्जानुसार त्यांनी दि. १७.०२.२०२० रोजी केलेली अनधिकृत पार्किंग व तक्रार विषयी चार मुद्यांवर माहिती विचारली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. ३१.१२.२०२० अनुसार अपिलार्थींना उत्तर दिले व पुन्हा दि. ०६.०१.२०२१ च्या पत्रानुसार अपिलार्थींना आणखी माहितीस्तव शुल्क भरण्यास कळविले. अपिलार्थींचे सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. २८.०१.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.०२.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देय माहिती १५ दिवसांत विनाशुल्क द्यावी असे आदेशित केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.०३.२०२१ च्या पत्रानुसार अपिलार्थींना माहिती पाठविलेली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांचे म्हणणे की, त्यांना मुळ माहिती अर्जातील मुद्दा क्र. २ व ४ ची माहिती अपूर्ण मिळालेली आहे. तसेच मुद्दा क्र. ४ अन्वये दिलेली माहिती साक्षांकित करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे की, मुद्दा क्र. २ मध्ये त्यांनी अपिलार्थींचे स्टेटमेंट रिकॉर्ड केलेले नाही तसे उत्तर अपिलार्थींना देता येईल. मुद्दा क्र. ४ बाबत दिलेली माहिती परिपूर्ण आहे व पुन्हा साक्षांकित करुन अपिलार्थींना पुरविण्यात येईल.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार माहिती अर्जातील मुद्दा क्र. २ व ४ बाबत सुधारीत उत्तर अपिलार्थींना १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क पुरवावे.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 27-6-2024

**मुंबई**
**दिनांक : २७.०६.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**